**प्रेस नोट** दिनांक :— १७/०५/२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १.श्री.उमेश महादेवराव गांवडे, वय ३८ वर्षे, पद — उपसरपंच ग्रामपंचायत गौरखेडा, रा.गौरखेडा ता.दर्यापूर जि.अमरावती (इलोसे)<br>२.श्री.गोपाल रामप्रसाद यादव, वय ५५ वर्षे, व्यवसाय — पानठेला चालक, खल्लार फाटा, रा.चंद्रपूर ता.दर्यापूर जि.अमरावती (खाजगी व्यक्ती) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | १७.०५.२०२३ चे ११/४७ वा. ते १२/१० वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ११०००/— रूपये. तडजोडीअंती १०,०००/— रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १०,०००/— रूपये. |
| ६ | घटनास्थळ | श्रीकृष्ण पानसेन्टर, खल्लार फाटा, खल्लार ता.दर्यापूर जि.अमरावती |

यातील तक्रारदार यांनी दिनांक ०३/०५/२०२३ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून त्यांनी ग्रामपंचायत गौरखेडा येथील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापणाचे कामाचा कंत्राट घेतला आहे. ग्रामपंचायत गौरखेडा येथील उपसरपंच श्री.उमेश गांवडे यांनी सदर सांडपाणी घनकचरा व्यवस्थापनाचे काम बंद पाडले व ते काम पुन्हा सुरू करण्याकरीता व कामाची तक्रार न करण्याकरीता ११,०००/—रु. लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.१०/०५/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामपंचायत गौरखेडा येथील उपसरपंच श्री.उमेश गांवडे यांनी सांडपाणी घनकचरा व्यवस्थापनाचे बंद पडलेले काम पुन्हा सुरू करण्याकरीता व कामाची तक्रार न करण्याकरीता तडजोडीअंती १०,०००/—रु. रूपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक १७/०५/२०२३ रोजी पंचासमक्ष आयोजित सापळा कारवाई दरम्यान इतर आरोपी लोकसेवक श्री.उमेश महादेवराव गांवडे, उपसरपंच ग्रामपंचायत गौरखेडा यांनी खाजगी व्यक्ती श्री.गोपाल यादव, पानठेला चालक यांचेजवळ तक्रारदार यांना १०,०००/— रुपये देण्यास सांगीतले वरुन आरोपी क्र.२ श्री.गोपाल यादव यांनी उपसरंपच गांवडे यांचेसांगणेप्रमाणे तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रूपये १०,०००/— पंचासमक्ष स्विकारली वरून आज़ रोजी दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द पो.स्टे.खल्लार, जि.अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.संजय महाजन, पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, श्री.एस.एस.भगत, पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रविणकुमार पाटिल, पो.ना. विनोद कुंजाम, युवराज राठोड, राहूल वंजारी, चालक पो.उप.नि.सतीश किटकुले, यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर — १०६४

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

(प्रविणकुमार पाटील)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती
मो.नं. ९८५००७०५०४